महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

विदर्भातील सर्व शेतकऱ्यांना १०० टक्के कर्जमाफी देण्याबाबत

(१) १७३१४ (१२-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील सर्व शेतकऱ्यांना १०० टक्के कर्जमाफी देण्यात यावी तसेच त्याचा सातबारा कोरा करण्यात यावा तसेच टंचाईगस्त सर्वच गावात गुरांच्या चाऱ्यासाठी छावणी उभारण्याची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी अशी मागणी उपेक्षित समाज महासंघाने केली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :(१) हे खरे नाही. अशा आशयाचे कोणतेही निवेदन मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनास प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) निवेदन शासन स्तरावर प्राप्त झालेले नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी भागातील लोकसंख्येचा अहवाल केंद्र शासनाला देण्याबाबत

(२) १९४२० (०८-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील लोकसंख्येचा प्रत्येक वर्षी केंद्राला द्यावा लागणारा अहवाल अद्यापपर्यंत शासनाने दिला नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त अहवाल केंद्राला कधीपर्यंत पाठवला जाणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०१-०६-२०१७) :(१) प्रत्येक आर्थिक वर्ष समाप्तीनंतर मा.राज्यपाल महोदयांमार्फत अनुसूचित क्षेत्राचा वार्षिक प्रशासकीय अहवाल मा.राष्ट्रपती महोदय यांना सादर केला जातो. त्याप्रमाणे राज्याचा अहवाल दिलेला आहे.

प्रस्तुत प्रशासकीय अहवालामध्ये राज्यातील आदिवासींची लोकसंख्या अंतर्भूत केलेली असते.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

बिलोली (जि.नांदेड) येथील उपसा जलसिंचन योजनेंतर्गत कर्जदार शेतकऱ्यांचे व्याज माफ करण्याबाबत

(३) २३०८१ (१७-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील कुंडलवाडी-शेगाव-चन्नापूर व पाटोदा-माष्टी (ता.बिलोली) या उपसा जल सिंचन योजनेंतर्गत कर्जदार शेतकऱ्यांना कोणताही फायदा न झाल्याने त्यांनी घेतलेले कर्जाचे मुद्दल शासनाने देण्याचा निर्णय होवून सदर रक्कमेवरील व्याज जिल्हा मध्यवर्ती बँकेने माफ करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच उक्त प्रकरणी शासन मुद्दल देवून जिल्हा मध्यवर्ती बँकेने दिलेल्या कर्जावरील व्याज माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (११-०५-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य उत्पादन शुल्क विभाग अकोला या कार्यालयात नियमबाहयरित्या केलेल्या पदोन्नतीबाबत

(४) २३०९९ (०६-०८-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क विभाग, अकोला येथे २१० दुय्यम निरिक्षकांची पदोन्नतीने बढती होणार असतांना त्याऐवजी २८० कर्मचाऱ्यांना बढती देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये मागासवर्गीयांच्या पदोन्नतीचे प्रमाणही ठेवले नाही याबाबत सामान्य प्रशासन विभाग, कोकण विभाग मागासवर्ग कक्षाच्या सहाय्यक आयुक्तांनी खुलासा मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती ज्या अधिकाऱ्यांनी ही हेतुपुरस्सर पदोन्नती नियमबाहय केलेली आहे अशा अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०५-२०१७) :(१), (२), (३), (४) व (५) दुय्यम निरीक्षक, राउशु या पदावरील पदोन्नतीची प्रक्रिया आयुक्त, राउशु यांच्या स्तरावर करण्यात येत असल्याने अकोला येथे २१० दुय्यम निरीक्षकांनी पदोन्नतीने बढती होणार असताना त्याऐवजी २८० कर्मचाऱ्यांना बढती देण्यात आली हे खरे नाही.

दुय्यम निरीक्षकांच्या सन २००९ च्या सेवाप्रवेश नियमानुसार एकूण मंजूर पदांच्या ५० टक्के म्हणजे ४१९ पदे पदोन्नतीने व उर्वरित ५० टक्के म्हणजे ४१८ पदे सरळसेवेने भरण्यात येतात. पदोन्नतीच्या एकूण ४१९ पदांपैकी २१० पदे जवान संवर्गातून सेवा ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीने व २०९ पदे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे जवान व लिपिक संवर्गातून अनुक्रमे ८०:२० या प्रमाणात भरण्याची तरतूद आहे. सन २००९ च्या सेवाप्रवेश नियमामध्ये मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेची नव्याने तरतूद करण्यात आल्यामुळे सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीने भरावयाच्या पदांची संख्या कमी झाली. मात्र सन २००९ चे सेवाप्रवेश नियम प्रसिध्द होण्यापूर्वी सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीने एकूण २२६ पदे भरलेली होती. त्यामुळे पदोन्नतीच्या कोट्यात १६ पदे अतिरिक्त झाल्याचे दिसून येते.

सन २००९ चे नवीन सेवाप्रवेश नियम अस्तित्वात आल्यानंतर जवान संवर्गातील काही कर्मचाऱ्यांनी दुय्यम निरीक्षक या पदावर पदोन्नती मिळण्याकरिता मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२०९२/२०११ व ४२३६/२०११ दाखल केल्या होत्या. त्यामध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार जवान संवर्गातील ६९ कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. त्यामुळे पदोन्नतीच्या कोट्यात एकूण ८५ पदे अतिरिक्त झाली होती. त्यापैकी ५ पदे पदोन्नतीने रिक्त झालेल्या पदावर समायोजित केल्यामुळे एकूण ८० पदे अतिरिक्त असल्याचे आढळून आले आहे.

दुय्यम निरीक्षक पदाच्या सन २००९ च्या सेवाप्रवेश नियमामध्ये पदोन्नतीने भरावयाच्या पदांची संख्या कमी करण्यात आल्यामुळे सर्वच प्रवर्गात अतिरिक्त नियुक्त्या झाल्या होत्या. मात्र आयुक्त, राउशु यांच्या कार्यालयामार्फत बिंदुनामावली पडताळणी करण्यासाठी सादर करताना उपरोक्त खुलासा सादर करण्याचे राहून गेल्यामुळे त्याबाबतचा शेरा सामान्य प्रशासन विभाग, कोकण विभाग, मागासवर्ग कक्षाच्या सहाय्यक आयुक्तांनी दिलेला आहे. आता पदोन्नती व सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदावर सदरच्या अतिरिक्त पदोन्नत्या नियमित करण्यात येत असून त्यानुसार २१० पदांची बिंदुनामावली सुधारित करुन याबाबतच्या वस्तुस्थितीसह पुन्हा पडताळणी करुन घेण्यात येत आहे.

ब्रम्हपुरी (जि.चंद्रपूर) येथे आदिवासी मुलांचे स्वतंत्र शासकीय वसतिगृह इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

(५) ३५४५३ (२२-१२-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी येथे आदिवासी मुलांचे स्वतंत्र शासकीय वसतिगृह नसल्यामुळे तालुका मुख्यालय असलेल्या ब्रम्हपुरी येथे आदिवासी विकास विभागाच्या वतीने सदर इमारतीचे बांधकाम करण्याकरिता रु. ३ कोटी ६३ लक्ष २५ हजार ७२ किंमत असलेल्या प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडून माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर आवशा/२०१५/प्रक्र-२६/का-१२ नुसार दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी आदिवासी विकास विभाग यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेकरिता पाठविण्यात आले असता गेल्या सात महिन्यांपासून सदर कामास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळालेली नसल्याची माहिती दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहाचे बांधकाम करण्यासाठी तातडीने निधीसह प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे लेखी निवेदन माहे मार्च २०१५, मे २०१५, सप्टेंबर २०१५, ऑक्टोबर २०१५ च्या सुमारास लोक प्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतिगृह इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधीसह प्रशासकीय मान्यता देण्याबाबत अर्थसंकल्प अधिवेशन मार्च, २०१५ च्या अधिवेशनामध्ये कपात सूचनेच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तालुका मुख्यालय असलेल्या ब्रम्हपुरी येथे आदिवासी मुलाचे स्वतंत्र शासकीय वसतिगृह इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०१-०६-२०१७) :(१), (२), (३), (४) व (५) चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथे आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह बांधकामाबाबतचे अंदाजपत्रक व आराखडयांची सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत छाननीही झाली आहे.

तथापि, आदिवासी विकास विभागांतर्गत बांधकाम व्यवस्थापन कक्ष स्थापन झाल्यावर ब्रम्हपूरी येथील वसतिगृहाचे अंदाजपत्रक जुन्या दरसूचीच्या आधारे तयार केल्याचे निदर्शनास आल्याने चालू दरसूचीच्या आधारे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी पुनश्च क्षेत्रीय कार्यालयांकडे पाठविण्यांत आले आहे.

या दरम्यान उच्च स्तरीय सचिव समितीच्या बैठकीत मा.मुख्य सचिव महोदयांनी अल्पसंख्यांक विभाग, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागातील वसतिगृहांसाठी एक समान नविन टाईप प्लॅन तयार करण्याबाबत निर्देशीत केले आहे. तथापि या निर्देशानुसार नविन टाईप प्लॅन तयार झाल्यानंतरच यावर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

मौजे खरपुडी (ता.खेड,जि.पुणे) येथील विजेचा खांब वाकल्याने १०० विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याबाबत

(६) ४१८१० (२०-०४-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खरपुडी (ता.खेड, जि.पुणे) येथील १०० विद्यार्थी असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात विजेचा खांब वाकल्याने विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेच्या छतावर विजेचा खांब पडून दुर्घटना होऊन होणारी जीवितहानी टाळण्याकरिता ग्रामपंचायतीने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान कार्यकारी अभियंता, खेड यांच्याकडे विजेचा खांब हटविण्याबाबत मागणी केली आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने होणारी दुर्घटना टाळण्यासाठी वाकलेला खांब हलविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) सदर ग्रामपंचायतीने पोल हलविणेबाबत मागणी केली आहे.

(३) व (४) लघुदाब विद्युत वाहिनी कडेला स्थलांतरीत करण्यासाठीचे अंदाजपत्रक देखभाल (मेंटेनन्स) योजने अंतर्गत महावितरण कंपनीमार्फत मंजूर केले असून शाळेच्या आवारातील भविष्यात धोकादायक असलेली तारमार्ग वाहिनी काढून शाळेच्या पटांगणाच्या कडेने भिंतीलगत भूमिगत वाहिनी टाकण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

संगमनेर (जि.अहमदनगर) येथील आदिवासी वसतिगृहाची दुरावस्था झाल्याबाबत

(७) ४३७८६ (२९-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) येथील आदिवासी वसतिगृहाची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असताना गृहपाल दुरुस्ती करण्याबाबत टाळाटाळ करीत असल्याने माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात विद्यार्थ्यांनी जेवण बंद आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत सदर वसतिगृहाची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर वसतिगृहाची दुरुस्ती करण्यास टाळाटाळ करणाऱ्या गृहपालावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर वसतिगृहाची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२९-०३-२०१७) :(१) संगमनेर (जि.अहमदनगर) येथे आदिवासी मुला-मुलींसाठी ४ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. यापैकी आदिवासी मुलांचे, (जुने) व आदिवासी मुलींचे (जुने) ही दोन वसतीगृहे भाड्याच्या इमारतीत कार्यरत असून सदर इमारतीमधील काही सोयी सुविधा अपुऱ्या असल्याने तेथील विद्यार्थ्यांनी सदर सोयी सुविधा मिळण्यासाठी जेवण बंद आंदोलन केले होते, हे खरे आहे.

(२) प्रकल्प कार्यालय, राजूर येथील आदिवासी विकास निरीक्षक व शिक्षण विस्तार अधिकारी यांनी सदर वसतीगृहांची पाहणी केलेली आहे.

(३) व (४) सदर पाहणीमध्ये दोन्ही इमारतींमध्ये किरकोळ सुधारणा आवश्यक असल्याचे आढळल्याने त्या दुरुस्त करुन देण्याबाबत संबंधित गृहपाल यांनी जागा मालकाशी पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार इमारतीच्या खिडक्या, झडपा बसविण्यात आल्या आहेत. रुममधील फॅन चालू केले आहेत. चेंबर दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले आहे. प्रकरणी आवश्यक सुविधा वेळीच उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

रिद्धपूर (जि.अमरावती) येथे रेल्वे स्थानक उभारण्याबाबत

(८) ४८१४१ (२४-०५-२०१६) ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील श्रीक्षेत्र रिध्दपूर महानुभाव पंथाची काशी म्हणून ओळखल्या जाणा-या पवित्र तीर्थस्थानाचे दर्शन घेण्याकरिता संपूर्ण देशातून व विदेशातून लाखो भक्त येत असल्याने रिद्धपूर येथे रेल्वे स्थानक उभारण्याबाबतचे निवेदन गोविंद प्रभु तीर्थस्थानक सेवा समितीने केंद्रीय रेल्वे मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१५ च्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची दखल घेऊन रिद्धपूर येथे रेल्वे स्थानक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१७) :(१), (२) व (३) प्रस्तावित केलेले रिध्दपूर रेल्वे स्थानक हे चांदूरबाजार रेल्वे स्थानक व कोल्विहीर (अवधूत) स्थानकाच्या दरम्यान आहे. प्रस्तावित रिध्दपूर रेल्वे स्थानक नव्याने उभारलेल्या कोल्विहीर (अवधूत) स्थानकापासून केवळ ३ कि.मी. अंतरावर आहे. रेल्वे बोर्डाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रस्तावित केलेली रेल्वे स्थानकाची जागा ही कोणत्याही स्थानकापासून कमीत कमी ५ कि.मी. च्या अंतरावर असणे आवश्यक आहे. त्यामुळे ३ कि.मी. इतक्या कमी अंतरावर दुसरे नवीन स्थानक उभारणे शक्य होणार नाही, असे मध्य रेल्वे यांनी कळविलेले आहे.

राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश मिळण्यासाठी शासकीय वसतीगृहाची क्षमतावाढ करण्याबाबत

(९) ४८३९८ (२९-०४-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश मिळण्यासाठी शासकीय वसतीगृहाकरिता क्षमतावाढीचा एकत्रीत प्रस्ताव मागविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्राप्त प्रस्तावानुसार शासनाने वसतीगृहाकरिता क्षमतावाढीबाबत प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२९-०३-२०१७) :(१) व (२) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता राज्यात एकूण ४९१ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. सदर वसतीगृहांची प्रवेश क्षमता ५८४९५ इतकी आहे. मागील तीन शैक्षणिक वर्षात वसतीगृह प्रवेशासाठी उपलब्ध क्षमतेपेक्षा अतिरिक्त मागणी पाहता आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून कार्यरत असलेल्या शासकीय वसतीगृहांची साधारणत: २०,००० विद्याथी क्षमता वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता.

तथापि, वाढीव क्षमतेकरीता वसतीगृह बांधकामास जागा मिळविणे, वसतीगृह बांधकाम करणे किंवा इमारत भाड्याने उपलब्ध करणे,वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती इ. करीता लागणारा विलंब व भांडवली खर्च टाळून चालू वर्षापासूनच लाभ देण्याच्या अनुषंगाने शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (DBT) रक्कम जमा करण्याबाबत मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दि.१५.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना सुरु करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पडकई विकास योजना राबविण्याकरिता दारिद्रय रेषेची अट शिथिल करणेबाबत

(१०) ४८९३९ (२९-०४-२०१६) श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पडकई विकास योजना राबविण्याकरिता विशेष केंद्रीय साहाय्य योजनेतंर्गत २०१४-१५ करिता शासन निर्णय-विकेंस-२०१६/प्र.क्र.०५/का१९ दि.१/२/१६ नुसार मंजुरी दिलेली रक्कम दारिद्रयरेषेच्या अटीमुळे खर्च झाली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दारिद्ररेषेची अट शिथिल करणेबाबत प्रकल्प अधिकारी, घोडेगाव यांनी आयुक्त, आदिवासी विकास यांना दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने काय निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०१-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांनी दि.१९/०१/२०१५ रोजी अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांना पाठविला आहे.
(३) सदर योजनेकरिता दारिद्रय रेषेची अट शासन शुध्दीपत्रक क्र.विकेस २०१५/प्र.क्र/का-१९, दि.२९/०९/२०१६ अन्वये शिथील करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील कोष्टी/विणकाम करणा-या समाजाला हलबा या अनुसूचित जमातीचा दर्जा मिळण्याबाबत

(११) ५०३७८ (२८-०४-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषतः विदर्भातील कोष्टी/विणकाम करणा-या समाजाला हलबा या अनुसूचित जमातीत गणले जावे व त्यांना अनुसूचित जमातीचा दर्जा मिळावा अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२४-०३-२०१७) :(१) होय.
(२) अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये समावेश करण्यासाठी केंद्र सरकारने लागू केलेले निकष कोष्टी ही जात पूर्ण करत नसल्याने सदर जातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सौर ऊर्जेवरील कृषीपंप खरेदीत झालेला गैरव्यवहार

(१२) ५३६५८ (१६-०८-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सौर ऊर्जेवरील कृषी पंप शेतकऱ्यांना पुरविण्याच्या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत शासनाने ५६६८ कोटीच्या खरेदी केलेल्या ५ अश्वशक्ती सौर कृषी पंपाच्या महाराष्ट्रातील निविदेमधील अटी व शर्ती कोणत्या होत्या व गुजरात व आंध्रप्रदेशच्या निविदेतील अटी कोणत्या होत्या,
(२) तसेच उक्त तिन्ही राज्यात खरेदी केलेले सौर कृषी पंप हे एकाच पुरवठादारांकडून खरेदी करण्यांत आले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास,प्रश्न भाग १ मध्ये उल्लेखित तिन्हीही राज्यातील सौर कृषी पंपाची तपासणीमध्ये आढळून आलेल्या तफावतीची जबाबदारी निश्चितपणे कोणावर येते व त्यासंदर्भात संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०५-२०१७) :(१) महाराष्ट्रातील सौर कृषि पंप खरेदीबाबतच्या निविदेमधील अटी व शर्ती या प्रमाणित कार्यपध्दतीनुसार (Standard operating system) तयार करण्यात आल्या असल्याने त्यांचा गुजरात व आंध्रप्रदेशच्या निविदेतील अटींशी संबंध नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गृहनिर्माण सोसायट्यांना भाजी विक्री केंद्र सुरु करण्याबाबत

(१३) ५३९६१ (२९-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने घाऊक बाजारात तुलनेने स्वस्त दरात विकली जाणारी भाजी घराघरापर्यंत पोहचवता यावी यासाठी थेट गृहनिर्माण सोसायट्यांना भाजी विक्री केंद्र सुरु करण्यासाठी उत्तेजन देण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे एप्रिल,२०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णय अंमलात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०६-०५-२०१७) :(१), (२) व (३) खरे नाही. मात्र, शासनाने राज्यामध्ये संत शिरोमणी श्री.सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान राबविण्याचा निर्णय दि.१२.०८.२०१६ रोजी घेतला आहे. या अभियानांतर्गत आतापर्यंत ९३ शेतकरी आठवडे बाजार सुरु करण्यात आलेले आहेत.

जालना जिल्हयातील महावितरणच्या कंत्राटी कामगारांना नियमाप्रमाणे वेतन देण्याबाबत

(१४) ५५२०८ (१६-०८-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील महावितरणच्या कंत्राटी कामगारांना नियमाप्रमाणे साडेसात हजार रुपये वेतन देणे बंधनकारक असतांना त्यांच्या हाती केवळ चार हजार रुपये दिले जात असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ मधील तीन महिन्याचा आणि मार्च व एप्रिल,२०१६ रोजीचा दोन दिवसाचा अशा एकूण पाच महिन्यांचे वेतन उक्त कामगारांना देण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयात ८२ कंत्राटी कामगार गेल्या पाच महिन्यांपासून बिनपगारी काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कंत्राटी कामगाराना साडेसात हजार रुपये वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे. संबंधीत कंत्राटी कामगारांना माहे मार्च, २०१६ व एप्रिल, २०१६ चे वेतन देण्यास विलंब झाला आहे. महावितरण कंपनीने अधीक्षक अभियंता, जालना यांना त्वरीत वेतन अदा करण्याचे आदेश दिले आहेत.

(४) व (५) सदर प्रकरणी महावितरण कंपनीने कार्यकारी अभियंता विभाग क्र. १, जालना यांना कारणे दाखवा नोटीस बजावून दंडाची शिक्षा बजावण्यात आली आहे. तसेच कार्यकारी अभियंता विभाग - २, जालना यांना देखील कारणे दाखवा नोटीस बजावून ताकीद देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीगोंदा (जि.अहमदनगर) शहरातील वडाळी येथील रस्त्यावर बनावट मद्याची विक्री होत असल्याबाबत

(१५) ५५४७६ (२०-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) शहरातील वडाळी येथील रस्त्यावर डोंबिवली येथून बनावट मद्य घेऊन हॉटेल धाब्यावर विक्री करण्यासाठी घेऊन आलेल्या दोघांकडून सुमारे ७५ हजार रुपयाचा बनावट मद्य साठा पोलीस आणि राज्य उत्पादन विभागाने केलेल्या संयुक्त कारवाईत आढळून आल्याची माहिती दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती बनावट मद्य विक्री करण्यासाठी घेऊन आलेल्या दोघांविरुध्द तसेच विक्री करणाऱ्या हॉटेल व धाब्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०३-२०१७) :(१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

दि.१८.४.२०१६ रोजी वडाळी रोड, आयटीआय कॉलेज समोर, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा येथे विनापरवाना अवैधरित्या वाहतूक होत असताना अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर यांच्या कार्यालयातील दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर ब-२ व कर्मचारी यांनी श्रीगोंदा पोलीस उप निरीक्षक यांचेसह संयुक्तपणे कारवाई करुन रु.७४,१६०/- किंमतीचा बनावट विदेशी मद्यसाठा तसेच रु.१,००,०००/- किंमत असलेल्या सॅन्ट्रो कार क्र.एमएस ०४-बीके-८३९३ या वाहनासह एकूण रु.१,७४,१६०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्ह्यात (१) अभय बाबुराव बोडके, (२) मनोज कृष्णा राजीवले या २ आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द गु.र.क्र. ८०/२०१६ दि. १८.४.२०१६ अन्वये गुन्हा नोंदविला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल व ढाब्यांवर विभागातील कार्यकारी अधिकारी/भरारी पथकांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत असून विशेष मोहिमेंतर्गत अशा ठिकाणांवर कारवाई करण्यात येते.

राज्यात कृषी उत्पन्न बाजार समितीमधील अडत व्यापारी व शेतकरी यांच्यामध्ये होत असलेल्या वादाबाबत

(१६) ५८२३२ (२२-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अडत व्यापाऱ्यांनी काही शेतकऱ्यांना मारहाण केल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अडत व्यापारी व शेतकरी यांच्यामध्ये वाद उदभवू नये वा विकोपास जावू नये याबाबत शासनाने आवश्यक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१८-०५-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
(२) अडत व्यापारी व शेतकरी यांच्यात चर्चा घडवून समोपचाराने वाद मिटविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुसळवाडी (ता.मालेगांव, जि.वाशिम) येथे शासकीय नविन आश्रमशाळा संकुलाचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत

(१७) ५९६३३ (२४-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुसळवाडी (ता.मालेगांव, जि.वाशिम) येथे शासकीय नविन आश्रमशाळा संकुलाचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दि. २० ऑगस्ट,२०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देण्यात येऊनही अद्यापी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब माहे जून, २०१६ मध्ये वा त्या सुमारास आढळून आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर कारवाई होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२५-०४-२०१७) : (१) मुसळवाडी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे नवीन मुसळवाडी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे नवीन शासकीय आश्रमशाळा संकुलास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २० ऑगस्ट, २०१३ रोजीचे निवेदन प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांच्याकडे प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) शासकीय आश्रमशाळा मुसळवाडी, ता.मालेगाव येथील आश्रमशाळा संकुल बांधकामाचे अंदाजपत्रक सन २०११ मध्ये तयार करण्यात आले होते व ते आदिवासी विकास विभागात प्राप्त झाले होते. परंतु सन २०१४-१५ पर्यंत दायित्व जास्त असल्यामुळे शासनाने कोणत्याही बांधकामास प्रशासकीय मान्यता दिलेली नाही. सबब, सदर अंदाजपत्रकामध्ये सुधारित दरसूचीनुसार सुधारणा करणेसाठी ते परत करण्यात आले असून आराखडे सुधारीत करुन चालू दरसूचीनुसार सादर करण्याबाबत कळविले आहे.

मौजे पाईट (ता.खेड, जि.पुणे) येथे रोहित्रात बिघाड होऊन २ महिने होऊनही दुरुस्ती केली जात नसल्याबाबत

(१८) ६२८३४ (१८-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाईट (ता.खेड, जि.पुणे) येथे रोहित्रात बिघाड होऊन २ महिने होऊनही दुरुस्ती केली जात नसल्याचे माहे एप्रिल २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २ महिने होऊनही रोहीत्र दुरुस्ती न केल्याने स्थानिक ग्रामपंचायतीने उपभियंता खेड यांस माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निवेदन देवूनही रोहित्र न बसविल्याने दिनांक ११ एप्रिल, २०१६ वा त्यासुमारास पाईट (ता.खेड, जि.पुणे) येथील शाखा कार्यालयात शेतकऱ्याने आत्महत्येचा प्रयत्न करूनही संबधित अधिकाऱ्यानी दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०६-२०१७) :(१), (२), (३) व (४) स्थानिक गामपंचायतीकडून उप अभियंता, खेड यांचेकडून नादुरुस्त रोहित्राबाबतचे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, मौजे पाईट गवारवाडी येथील इन्फ्रा-२ योजनेअंतर्गत दि.२८.०२.२०१६ रोजी कार्यान्वित केलेला नवीन रोहित्र दिनांक ०२.०४.२०१६ रोजी नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आल्याने सदरहू नादुरुस्त रोहित्र दिनांक ११.०४.२०१६ रोजी बदलण्यात आले आहे. त्यादरम्यान सदर रोहित्रावरील ग्राहकांना बाजूच्या रोहित्रावरुन वीज पुरवठा देण्यात आला होता. तसेच त्यासुमारास पाईट (ता.खेड, जि.पुणे) येथील शाखा कार्यालयात शेतकऱ्याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची कोणतीही घटना घडलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुसूचीत जमातीच्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थांसाठी पंडित दीन दयाळ उपाध्याय स्वयंम योजना सुरु करण्याबाबत

(१९) ६५५२१ (१९-१२-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकारने राज्यातील अनुसूचीत जमातीच्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थांसाठी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास पंडित दीन दयाळ उपाध्याय स्वयंम योजना सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सन २०१६-१७ साली या योजनेचा किती विद्यार्थांना फायदा देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, त्यासाठी वार्षिक किती खर्च होणार आहे ?

श्री. विष्णु सवरा (२९-०३-२०१७) :(१) शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इ. १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणासाठी निवास, आहार व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घेण्याकरीता त्यांचा आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम जमा करण्याबाबत दि.१५.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) सन २०१६-१७ या वर्षात योजनेंतर्गत ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे योजनेच्या निकषानुसार १५५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.
(३) सदर योजनेंतर्गत सन २०१६-१७ या वर्षाकरीता माहे नोव्हेंबर, २०१६ ते मार्च, २०१७ करीता अंदाजे रु.४.०० कोटी इतका खर्च होणार आहे.

परळी थर्मल पॉवर स्टेशन (जि.बीड) मधील वीज निर्मिती पूर्ववत सुरु करण्याबाबत

(२०) ६६१०४ (०७-०१-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी थर्मल पॉवर स्टेशन (जि.बीड) मधून होणारे वीज निर्मितीचे काम गत सहा महिन्यांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदरहू वीज निर्मितीचे काम पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वर्धा महावितरणच्या बोरगाव (मेघे) येथील सबस्टेशनला लागलेली आग

(२१) ६६३४१ (०७-०१-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा महावितरणच्या बोरगाव (मेघे) येथील सबस्टेशनला आग लागल्याची घटना दि. १९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती वर्धा महावितरणाच्या बोरगाव (मेघे) येथील सबस्टेशनला लागलेल्या आगीत नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०३-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

सदरील उपकेंद्र हे महावितरणचे नसून महापारेषण कंपनीचे आहे. महापारेषण कंपनीच्या २२० के.व्ही. वर्धा-I उपकेंद्रातील २२०/६६ के.व्ही. रोहित्र क्र.२ ला दि.१९.०९.२०१६ रोजी आग लागली होती.

(२) या प्रकरणी महापारेषण कंपनीकडून चौकशी करण्यात आली असून वर्धा अति उच्चदाब विभागातील तांत्रिक कर्मचारी व अधिकारी यांचे कामात दुर्लक्ष झाल्याचे दिसून आले. त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे.

(३) सदर सबस्टेशनमध्ये लागलेल्या आगीत रोहित्र क्र.२ जळून पूर्णपणे नादुरुस्त झाले. परंतु त्यामुळे कुणाचही नुकसान झाले नाही. त्यामुळे नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासींसाठी असलेली स्वाभिमान व सबलीकरण योजना पुनश्च सुरु करण्याबाबत

(२२) ६६७२० (१६-१२-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भूमिहीन आदिवासी कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शासनाने सन २००७-०८ पासून स्वाभिमान व सबलीकरण योजना सुरु केली परंतु सदर योजनेस जमीन उपलब्ध होत नसल्याने आदिवासी विकास विभागाच्या अधिका-यांनी सन २०१२ पासून ही योजना परस्पर बंद केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदरहू योजना सुरु झाल्यापासून केवळ ४०० कुटुंबांना लाभ मिळाला असून काही ठराविक प्रकल्प कार्यालये सोडल्यास इतर ठिकाणी या योजनेची कोणतीच अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणारा निधी काही प्रकल्प कार्यालयांनी परत पाठविला असून जमिन मिळण्यासाठीचे अनेक अर्ज धुळखात पडले आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास,सदर योजना पुनश्च सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१०-०३-२०१७) : (१) हे खरे नाही.

राज्यातील भूमिहिन दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटूंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी, शासनाने शासन निर्णय क्र. भुवायो २००३/प्र.क्र.१४२ / का.०९, दि. २४ फेब्रुवारी, २००४ अन्वये भूमिहिन दारिद्रय रेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना सुरु केली आहे. सदरील योजना आजतागायत सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

सदरहू योजनेची सन २००४-०५ ते २०१६-१७ या वर्षामध्ये सर्व प्रकल्पामार्फत अंमलबजावणी झालेली असून आजतागायत एकूण ७२० लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे.
(३) जमिन उपलब्ध नसल्याने काही अशी तरतूद समर्पित करण्यात आलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात बनावट दारुची विक्री केली जात असल्याबाबत

(२३) ६७०१३ (१६-१२-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणावर बनावट दारुची विक्री केली जात असल्यामुळे राज्याचे आर्थिक नुकसान होत असून दारुचे नेमके किती उत्पादन होते व त्याचा पुरवठा कसा केला जातो यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने दारुच्या बाटल्यांवर होलोग्राम बसविणे सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक हजार कोटी रुपयांची होलोग्राम पुरवठ्यासाठी निविदा काढण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निविदेत अटी व शर्तीमध्ये त्रुटी आढळल्यामुळे हजारो कोटी रुपयांचे होलोग्राम पुरवण्याचे कंत्राट रद्द करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कंत्राट रद्द करण्याचे कारण काय आहेत तसेच बनावट दारुवर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०४-२०१७) :(१), (२), (३), (४) व (५) दारुच्या बाटल्यांवर होलोग्राम बसविण्याचा निर्णय घेण्यात आला होता हे खरे आहे व निविदा काढण्यात आली होती तथापि, ही निविदा एक हजार कोटी मूल्याची नव्हती. ट्रॅक ॲन्ड ट्रेस प्रणालीबाबत देश/विदेशात उपलब्ध अद्ययावत तंत्रज्ञानाचा विचार करुन तसेच सखोल अभ्यास करुन निविदेच्या अटी व शर्तीमध्ये आवश्यक ते बदल करण्याच्या दृष्टीने निविदा रद्द करण्यात आली हे खरे आहे.

या विभागाच्या सीमा तपासणी नाके तसेच भरारी पथक यांचेमार्फत बनावट दारुवर नियंत्रण ठेवण्याची कार्यवाही करण्यात येते.

नाशिक येथील एकलहरे वीज निर्मिती केंद्रातील तीन संच बंद पडल्याबाबत

(२४) ६७०७२ (०७-०१-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील एकलहरे वीज निर्मिती केंद्रातील, तीन संच बंद पडल्यामुळे, औष्णिक वीज निर्मिती केंद्राचे, सुमारे दिड कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संच बंद पडण्याची सर्वसाधारण काय आहेत तसेच यामध्ये काही त्रुटी असल्यास त्या तात्काळ दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाकडून जिल्हा परिषद शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे वाटप त्वरित करण्याबाबत

(२५) ६७४११ (११-०१-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाकडून जिल्हा परिषद शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे वाटप अद्याप केले नसल्याची बाब दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती शिष्यवृत्तीचे वाटपास विलंब केलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच शिष्यवृत्तीचे वाटप त्वरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०४-२०१७) :(१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या इ.१ ली ते १० मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता दि.३१ मे, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये "सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना" सुरु करण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ चा निधी जिल्हा परिषदेकडे वितरीत करण्यात आलेला आहे. मात्र ऑनलाईन संगणकीय प्रणालीमध्ये काही तांत्रिक अडचणी आल्याने शिष्यवृत्ती वाटपास काही प्रमाणात विलंब झाला आहे, हे खरे आहे.
(२) व (३) सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ऑनलाईन प्रणालीमार्फत शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य उपलब्ध करण्यात आलेले असून शिष्यवृत्ती वाटपाची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागभीड, सिंदेवाही,गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) या तिन्ही तालुक्यातील एम.आय.डी.सी. मध्ये उद्योग कार्यान्वित झाले नसल्याबाबत

(२६) ६८७०९ (१६-१२-२०१६). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड, सिंदेवाही, गोंडपिंपरी या तालुक्यातील औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर एकही उद्योग व्यवसाय अस्तित्वात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागभीड तालुक्यामधील बहुतांश भाग हा वन संपदेनी व्याप्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागभीड औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर वन क्लस्टर उभारण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रस्तावित आहे काय,

(४) तसेच या भागात उद्योगांना चालना मिळण्याकरिता पर्यायी उपययोजना योजल्या आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०५-२०१७) :(१) नागभिड लघु औद्योगिक क्षेत्रात ५, सिंदेवाही लघु औद्योगिक क्षेत्रात १ असे एकूण ६ उद्योग व्यवसाय सुरु असून गोंडपिंपरी लघु औद्योगिक क्षेत्रात ३ भूखंड उद्योग व्यवसायाकरिता वाटप करण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नागभीड औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर वन क्लस्टर उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(४) चंद्रपूर जिल्ह्यात उद्योगांना चालना मिळणेस १३ औद्योगिक क्षेत्र महामंडळाकडून स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच काही ठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून काही ठिकाणी पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तसेच रायगड जिल्ह्यातील रोह्यात दोन मोठे उद्योग प्रकल्प उभारण्याबाबत

(२७) ६८७६० (१६-१२-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तसेच रायगड जिल्ह्यातील रोह्यात दोन मोठे उद्योग प्रकल्प उभारण्याचा निर्णय राज्य व केंद्र शासनाने संयुक्तपणे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही प्रकल्पाला किती जमिनी संपादित करण्यात आल्या आहे,
(३) असल्यास, या प्रकल्पामुळे किती तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे,
(४) असल्यास, हे प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री. सुभाष देसाई (१९-०५-२०१७) :(१) रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात तसेच सिंधुदूर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात राज्य व केंद्र शासनाच्या निर्णयानुसार ग्रीन रिफायनरी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. सदर भूसंपादनाची कार्यवाही प्राथमिक स्तरावर आहे.
(२), (३) व (४) वरील प्रकल्पाकरिता अंदाजे ६००० हे. आर. क्षेत्र संपादित करावयाचे आहे. सदर भूसंपादनाची कार्यवाही प्राथमिक स्तरावर आहे.

अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांना त्यांची कृषी उत्पादने थेट विक्री करता यावी यासाठी शेतकरी बाजाराकरिता जागा उपलब्ध करुन देणेबाबत

(२८) ६९१२५ (१६-१२-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना त्यांची कृषी उत्पादने थेट विक्री करता यावी यासाठी शेतकरी बाजाराकरिता अकोला, वाशिम व बुलढाणा या तीन जिल्ह्यांमध्ये एकाही नगरपरिषदेने जागा उपलब्ध करुन दिली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथे शेतकरी बाजाराकरिता आवश्यक जागा उपलबध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०८-०५-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान राबविण्यात येत आहे. आयुक्त, महानगरपालिका, अकोला, मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद - वाशिम यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापि अद्याप जागा उपलब्ध झालेली नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिका बुलढाणा यांना प्रस्ताव सादर केला असता जागा उपलब्ध नसल्याने जिल्हा परिषद शाळेच्या आवारात बाजार सुरु करणेबाबत कळविले होते. परंतू शाळेच्या आवारात बाजार चालू करणे योग्य होणार नाही असे जिल्हा परिषदेने जिल्हाधिकारी कार्यालयास कळविले आहे.
(२) व (३) जागा उपलब्ध झाल्यानंतर पणन मंडळामार्फत अकोला, वाशिम व बुलढाणा शहरात आठवडे बाजार सुरु करण्यात येतील.

शासनाला केंद्र शासनाकडून आदिवासी पाडयांचा विकास करण्यासाठी ३६ कोटी रूपयांचा निधी मिळाल्याबाबत

(२९) ६९४२३ (११-०१-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाला केंद्र शासनाकडून आदिवासी पाडयांचा विकास करण्यासाठी ३६ कोटी रूपयांचा निधी मिळाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीतून राज्यातील पुणे,पालघर,गडचिरोलीतील एक हजार आदिवासी गावांची निवड करण्यात आली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने स्मार्ट सिटी धर्तीवर राज्यातील आदिवासी गाव स्मार्ट गाव करण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१०-०३-२०१७) :(१) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत अनुदान या योजनेअंतर्गत Climate smart Village या प्रस्तावाकरीता रु.२८.८७ कोटी निधी प्राप्त झाला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) या योजनेची अंमलबजावणी बोरलॉग इन्स्टीट्युट ऑफ साऊथ एशिया व आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांचे मार्फत या एक हजार गावांमध्ये प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

धनगर समाजाचा धनगर व धनगड या शब्दांचा भेद निर्माण केला असून समाजाला आरक्षणचा लाभ देण्याबाबत

(३०) ७००४१ (११-०१-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजाचा अनुसूचित जाती जमातीमध्ये समावेश करण्यात आला मात्र धनगर व धनगड या शब्दांचा भेद निर्माण केला असून समाजाला आरक्षणाचा लाभ दिला जात नाही तो तातडीने द्यावा, यासाठी टाटा कन्सलटन्सी या कंपनीमार्फत सुरु असलेले संशोधन तातडीने थांबवावे अशी मागणी माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२०-०३-२०१७) :(१) व (२) श्री.अण्णासाहेब डांगे, महाराष्ट्र धनगर समाज महासंघ यांचे दिनांक ०८.०९.२०१६ चे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

मा.मुख्यमंत्री यांनी सन २०१५ मध्ये विधानपरिषदेमध्ये दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने धनगर किंवा धनगड एक आहेत किंवा कसे याबाबत संशोधन करुन अहवाल सादर करण्याबात टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार संस्थेकडून सदर संशोधन तीन टप्प्यात करण्यात येणार आहे. त्यापैकी संशोधनाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत (Formative Research) मुख्य संशोधनाचे भाग-१ व भाग-२ मधील संशोधनाचे काम पुर्ण करुन अंतीम अहवाल माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत सादर करण्यात येईल, असे टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी शासनास कळविले आहे. तद्नुसार संस्थेचा अंतीम अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्हयातील एटापल्ली तालुक्यातील गावातील लोकांना वनपट्टे मिळण्याबाबत

(३१) ७०२७१ (०९-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील एटापल्ली तालूक्यातील जारावंडी, दोलदा, दिंडवी, भापडा, जांभुळगठा, गर्तावाही, मंजीगड, ईरपनपायली, मालेनगठा, हनपायली, वेडमागड, टेक्का, कसुरवाडी, सरखेडा, व वंडोली या गावातील वन जमिनीवरील अतिक्रमण धारकांचे वनहक्क कायदा अधिनियम २००६ नुसार अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी शेतकरी अतिक्रमण केलेल्या वनजमिनीचे पट्टे २००८ पासून शासनाकडे प्रलंबित असल्याची माहिती दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी शेतकरी अतिक्रमण केलेल्या वनजमिनीचे पट्टे २००८ पासून शासनाकडे प्रलंबित असल्यामूळे त्यांना अधापही वन पट्टे मिळालेले नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व अतिक्रमण धारकांना वन पट्टे मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (३१-०५-२०१७) : (१) हे खरे नाही,

एटापल्ली तालुक्यामध्ये ग्रामसभेने मान्यता दिलेल्या एकुण ३९६२ दाव्यांपैकी जिल्हास्तरीय वनहक्क समिती, गडचिरोली यांनी २९९६ दाव्यांना मान्यता दिलेली आहे. तर ५१२ दावे नामंजूर केलेले आहेत. याव्यतिरिक्त इतर दाव्यांमध्ये त्रुटी असल्याने जिल्हास्तरीय वनहक्क समितीने ते दावे उपविभागस्तरीय समितीकडे पुर्नविलोकनार्थ परत पाठविले आहेत.

(२) हे खरे नाही.

एटापल्ली तालुक्यात एकूण २९९६ वैयक्तिक वनहक्क पट्टे वितरीत करण्यात आलेले आहेत.
(३) व (४) गडचिरोली जिल्हयातील प्रलंबित वनहक्क धारकांच्या पट्टयांच्या प्रकरणांची जिल्हाधिकारी, गडचिरोली कार्यालयामार्फत तपासणी सुरु आहे. त्यानुसार १९६ मूळ प्रकरणांच्या दाव्यांमध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे जिल्हास्तरीय वनहक्क समितीने सदर प्रकरणे उपविभागीय अधिकाऱ्याकडे पाठविली आहेत. उक्त प्रकरणातील दाव्यांमधील त्रुटींची पुर्तता झाल्यावर जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडून निर्णय घेण्यात येणार आहे.

गोंदिया जिल्हयातील कामठा येथे अवैध हातभट्टी व बनावट दारुचा साठा जप्त करण्यात आल्याबाबत

(३२) ७०३०१ (१६-१२-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयातील कामठा येथील अवैध हातभट्टी व बनावट दारु तयार करणा-यांवर दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी राज्य उत्पादन शुल्क पथकाने छापा टाकून आरोपींना अटक करुन ५४ हजार २२५ बनावट रसायन दारुचा साठा व मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकणी चौकशी करुन आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०३-२०१७) :(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया यांचे कार्यालयातील दुय्यम अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया ग्रामीण यांनी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार दि.१३.१०.२०१६ रोजी मौ.कामठा येथे नामे रंजीत सुकलाल दहीकर रा.कामठा, ता.जि.गोंदिया यांच्या राहत्या घरी छापा टाकून बनावट दारु तयार करण्याकरिता वापरण्यात येणारे स्पिरीट, झाकणे, रिकाम्या बाटल्या व इतर साहित्य असा एकूण रु.५४,२२५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर आरोपीस अटक करुन त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील कलम ६५ ए, बी, सी, डी, ई, एफ ८१, १०५, १०८ नुसार गु. रजि. क्र.१०७/२०१६, दि.१३.१०.२०१६ नोंद करण्यात आला आहे.

विभागीय आदिवासी जातपडताळणी कार्यालय अमरावती येथे मागील ३ वर्षापासुन आदिवासींची जात पडताळणी प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

(३३) ७०३०७ (११-०१-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय आदिवासी जातपडताळणी कार्यालय अमरावती मध्ये एकच संशोधन अधिकारी असल्याने मागील ३ वर्षापासुन आदिवासींची जात पडताळणी प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती विभागातील आदिवासी विद्यार्थी जात पडताळणी प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे शिक्षण, नोकरी व इतर सवलतीपासून वंचित राहीले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास,चौकशीअंती आदिवासी विद्यार्थाचे जात पडताळणीचे प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०३-०४-२०१७) :(१) हे खरे नाही. राज्यातील प्रत्येक समितीमध्ये संशोधन अधिकाऱ्याचे एकच पद असते. त्यानुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती अमरावती मध्ये संशोधन अधिकाऱ्याच्या पदावर अधिकारी कार्यरत आहे.
(२) नाही.
(३) व (४) प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टिने नियमित आढावा घेणे, निश्चित प्रमाणपत्र प्रकरणे निकाली काढणे तसेच दक्षता पथकामधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. जात प्रमाणपत्रांची पडताळणी जलगतीने व पारदर्शक पध्दतीने होण्यासाठी “आदिप्रमाण” प्रणाली सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील आदिवासी ठाकर समाजाला जात प्रमाणपत्र मिळवून देण्याबाबत

(३४) ७०५३० (११-०१-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील गेली ११ वर्ष आदिवासी ठाकर समाजाला वडील, भाऊ, बहिण यांची जात वैधता प्रमाणपत्र असतानाही त्याच कुटूंबातील इतर सदस्यांना रुढी - परंपरा, क्षेत्रबंधनाच्या नावाखाली जात प्रमाणपत्रे नाकारली जात असल्याने त्यांना शासनाच्या योजनापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील आदिवासी ठाकर समाजाला जात प्रमाणपत्र मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०३-०४-२०१७) :(१) व (२) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २०००, (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३) व महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीतील नमूद अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करणाऱ्या प्रत्येक अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र देण्यात येते.

तथापि, उत्तर सोलापुर तालुक्यातील ठाकर जमतीचे प्राप्त अर्जांमध्ये काही प्रकरणात दावेदारांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांत खाडाखोड करुन ठाकर असे नंतर लिहिल्याचे आढळून आल्याने तसेच अर्जासोबत इतरांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या काही प्रकरणात दावेदारांनी नातेसंबंधातील वंशावळप्रमाणे पुरावे सादर केले नसल्याने माहे जुन, २०१६ मध्ये दावेदारांचे अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती यार्डातील
आधारभूत खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

(३५) ७०५८७ (१६-१२-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात फळ, भाजीपाला खरेदी ही माहे जून-जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान अडतमुक्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणीमध्ये खरेदीदाराऐवजी शेतक-यांकडून अडत घेतली जात असल्याने दि.२१ ऑगस्ट, २०१६ रोजी शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परभणी यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच परभणी जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती यार्डातील अडत व्यापारी खरेदीदार व फडकरी शासनाने ठरवून दिलेल्या आधारभूत किंमतीपेक्षा एक हजार रुपये कमी दराने मुगाची खरेदी करीत असल्याने शेतक-यांची पिळवणूक होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या ठिकाणी आधारभूत खरेदी केंद्र त्वरीत सुरु करण्याबाबत जिल्हाधिकारी व जिल्हा मार्केटींग अधिकारी यांच्याकडे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांनी अनेक वेळा मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०६-०५-२०१७) :(१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) नाही.

परभणी जिल्ह्यातील ३ बाजार समित्यांमध्ये मूग खरेदीसाठी आधारभूत केंद्रे सुरु केलेली होती. सदर खरेदी केंद्रांवर झालेली खरेदी पुढीलप्रमाणे आहे.

बाजार समितीचे नांव	एकूण खरेदी	कमाल दर	किमान दर	सरासरी दर
परभणी	१८५६	४२००	५२९९	४७५०
मानवत	९७६	४२००	५५६०	४९५०
सेलू	१०६७	४८००	५२००	५०००

(४) होय.

जिल्ह्यातील ३ बाजार समित्यांमध्ये मूग खरेदीसाठी आधारभूत केंद्र सुरु करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कृषी उत्पन्न बाजार समिती चामोर्शीच्या तत्कालिन सभापतीनी त्यांचे कार्यकाळात केलेल्या गैरव्यवहाराबाबत

(३६) ७०७०० (१७-१२-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी उत्पन्न बाजार समिती चामोर्शीचे तत्कालिन व सद्य:स्थितीत असलेले सभापती श्री. अतुल गण्यार पवार यांनी दि.०७ फेब्रुवारी, २००९ ते १४ नोव्हेंबर, २०१४ चे सभापती पदाच्या कार्यकाळात विविध कामामध्ये गैरव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांनी सन २००९ ते २०१३ या काळात विमान प्रवास अनुदेय नसताना सुद्धा अनधिकृतपणे प्रवास केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन प्रशासकाने त्यांचेकडून विमान प्रवास व रेल्वे प्रवासांची संपूर्ण रक्कम वसूल न करता केवळ त्यातील तफावत रक्कम भरण्यास सांगितले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, श्री.अतुल गण्यार पवार यांना दि. २३ एप्रिल, २०१४ रोजी बेकायदेशीरपणे कर्मचाऱ्यांची भरतीत केलेल्या गैरव्यवहारात लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बहुमत नसताना व त्यांच्या सभापती पदावर अविश्वास ठराव पारित झालेला असताना जुन्या ठरावाच्या आधारे ठराव पारित करून अनेक कामामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१८-०५-२०१७) :(१) श्री.अतुल गण्यार पवार यांचेवर बाजार समितीकडून अग्रीमाची रक्कमेची उचल घेऊन दिर्घ कालावधीसाठी स्वत:कडे ठेवणे, अनुज्ञेय नसताना विमानाने प्रवास करणे, कंत्राटदारांकडून लाच स्विकारणे असे आरोप आहेत.

(२) व (३) बाजार समितीच्या सभापतींनी कोणत्या वाहनाने प्रवास करावा याबाबत पणन अधिनियमात स्पष्ट तरतूद नाही. परंतू चौकशी अहवालाच्या आधारे त्यांना बस किंवा रेल्वेचे जे भाडे अनुज्ञेय होते ती रक्कम वगळून विमान प्रवासापोटी खर्च केलेल्या उर्वरित रकमेची वसूली करण्याचे कळविले आहे.

(४) अंशत: खरे आहे. कंत्राटदाराकडून लाच स्विकारल्याच्या आरोपाखाली त्यांना अटक झाली होती. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) व (६) श्री. गण्यार पवार विरुध्द अविश्वास ठराव मांडण्यात आला होता. परंतू ठरावावर झालेल्या मतदानाचा निर्णय जाहीर करण्यास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. दरम्यानच्या काळात त्यांच्यावरील आरोप मा.न्यायालयात अद्याप सिध्द झालेले नसल्यामुळे, निवडणूक होऊन श्री.गण्यार पवार यांची सभापतीपदी निवड झालेली आहे.

ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील वसतीगृहाची बांधकामे प्रलंबित असल्याबाबत

(३७) ७०८८५ (११-०१-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील वसतीगृहांची बांधकामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात दरवर्षी आदिवासी विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण मोठया प्रमाणात असल्यामुळे वसतीगृहाअभावी विद्यार्थ्यांची प्रचंड परवड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वसतीगृहांची क्षमता तातडीने वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१९-०५-२०१७) :(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील जव्हार, डहाणू व शहापूर या तीन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील एकूण ६ वसतिगृह बांधकामांना सद्य:स्थितीत मंजूरी प्राप्त झालेली आहे. यापैकी जव्हार प्रकल्पातील वाडा (मुलांचे जुने), वाडा (मुलांचे नवे) व वाडा (मुलींचे) अशी एकूण ३ वसतीगृहांची बांधकामे पुर्ण, डहाणू प्रकल्पातील तलासरी (मुलींचे जुने) वसतीगृहाचे बांधकाम प्रगतीत व तलासरी (मुलींचे नवे) वसतीगृहाचे काम निविदास्तरावर आहे तसेच शहापूर प्रकल्पातील ठाणे (मुले-१००० पैकी ३२८) वसतीगृहाचे काम अद्याप सुरु नाही.

(२) डहाणू, जव्हार व शहापूर या तीन प्रकल्पांतर्गत वसतिगृहांची मंजूर प्रवेश क्षमता अनुक्रमे १४५०, १४७५ व ७५० इतकी असली तरी इमारत क्षमता प्रत्यक्षात अनुक्रमे १७०४, १५७४ व ८८० इतक्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.

तसेच या व्यतिरिक्त वसतिगृहात प्रवेश प्राप्त न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी "पंडीत दिन दयाळ उपाध्याय स्वयम्" योजना सुरु करण्यात आली असून या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी निवास, भोजन व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट निधी जमा करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील देवनार गांव, गोवंडी येथील वैती वाडीत गेली अनेक वर्षापासून वीज पुरवठा नसल्याबाबत

(३८) ७११९४ (०७-०१-२०१७). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील देवनार गांव, गोवंडी येथील वैती वाडीत गेली अनेक वर्षापासून वीज पुरवठा नसल्याबाबत राजकीय पक्षाचे पदाधिकारी दि.३.११.२०१६ रोजीच्या सुमारास उपोषणास बसले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावेळी लेखी निवेदन देण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, त्या निवेदनानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०५-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) देवनार गाव, गोवंडी येथील वैती वाडी या ठिकाणी वीज पुरवठा देण्याकरिता ओ.पी.एंटरप्राईझेस कुकरेजा बिल्डर व डेव्हलपर यांची हरकत असल्यामुळे अर्जदारांनी त्यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र आणल्यानंतर केबल टाकून वीज पुरवठा देण्याबाबत रिलायन्स कंपनीने संबंधित अर्जदारास कळविले आहे.

पालघर जिल्ह्यात विक्रमगड येथे पेसा व वनहक्कासंदर्भात कार्यशाळा घेण्यात आली असल्याबाबत

(३९) ७१३७२ (११-०१-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात विक्रमगड येथे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये पेसा व वनहक्कासंदर्भात कार्यशाळा घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रात पेसा गावाच्या निर्मितीबाबत व अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींसाठी ५ टक्के निधी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीना हस्तांतरित करण्यासंबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, पेसा अधिकारांमुळे आदिवासींच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने छोटया-ग्रामसभा निर्माण होऊन गावांपासून दूर असलेल्या वाडया-पाडयांतील समस्या कशा प्रकारे सोडविण्यात आल्या आहेत,

(४) अद्यापही या प्रकरणी अंमलबजावणी सुरु झाली नसल्यास त्यासंबंधीची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०३-०४-२०१७) :(१) होय.

माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये विक्रमगड येथे कार्यशाळा घेण्यात आली होती.

(२) पालघर जिल्ह्यातील एकूण ६५४ पेसा गाव घोषित प्रस्ताव पैकी ५५९ उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर सादर व ८५ जिल्हाधिकारी स्तरावर व १० विभागीय आयुक्त यांना सादर करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१५-१६ चा लोकसंख्येच्या प्रमाणात व सन २०१६-१७ चा आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात पेसा ५% अबंध निधी पालघर जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी विकास विभागाकडून RTGS द्वारे थेट वर्ग करण्यात आला आहे.

(३) ग्रामपंचायतीमध्ये पेसा गाव निर्मितीसाठी ग्रामपंचायत वाडी-पाड्यां-वस्त्यांवरील मतदारांनी मागणी केल्यास वाडी-पाड्यावर सभा घेऊन पेसा गांव निर्मितीसाठी प्रस्ताव उपविभागीय कार्यालय यांकडे सादर केला जातो. तसेच या गावांना उपलब्ध करुन दिलेला पेसा ५% अबंध निधी पायाभुत सुविधा, पेसा कायद्याची अंमलबजावणी, आरोग्य-शिक्षण-स्वच्छता, वनीकरण, वनसंवर्धन, वनतळी, वन्यजीव या बाबीवर करुन विकास कामे घेण्यात यावी यासंदर्भात सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खेड तालुक्यात महावितरण कंपनीने फ़क्त वीज मीटर देऊन वीज जोडणी न करताच शेतकऱ्याला वीज देयके दिल्याबाबत

(४०) ७१४३७ (०७-०१-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाला नव्याने वीजजोडणी करिता केंद्र शासनाच्या योजनेनुसार महावितरण कंपनीने फ़क्त वीज मीटर देऊन वीज जोडणी न करताच शेतकऱ्याला वीज देयके दिल्याचे प्रकरण माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड तालुक्यातील पाईट परिसरातील किवळे गावच्या लिबळे वस्ती मधील श्री.ज्ञानेश्वर भिका म्हसे या शेतकऱ्याला महावितरण कंपनीने दीड वर्षापूर्वी मीटर ताब्यात देऊन वीज जोडणीची व्यवस्था नसतानाही विजेची देयके पाठविण्यात आली व याबाबतची तक्रार सदर शेतकऱ्याने तालुक्यातील महावितरणच्या वायरमन पासून ते उपविभागीय कार्यकारी अभियंता

यांची प्रत्यक्ष भेट घेऊन हे प्रकरण निदर्शनास आणूनही अद्याप महावितरण कडून कोणतीच कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड तालुक्यातील महावितरणच्या या भोंगळ व मनमानी कार्यपद्धती बाबत शेतकऱ्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे तक्रारी केल्यानंतर महावितरणने या प्रकरणी तत्काळ निर्णयात्मक कार्यवाही करावी अशी मागणी केली असताना अद्याप निर्णय घेण्यात आलेला नसल्याने वीज न वापरणाऱ्या शेतकऱ्यांना बोगस देयके पाठविण्यास जबाबदार असणाऱ्या महावितरण कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाईची सद्य स्थिती काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०६-२०१७) : (१) हे खरे आहे.

(२) सदर तक्रारीनुसार महावितरणच्या राजगुरुनगर विभागातर्फे त्या ठिकाणची स्थळ पाहणी केली असता असे निदर्शनास आले की, सदरील वीज जोडणीचे कोटेशन राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत भरलेले होते आणि त्याठिकाणी नवीन वीज जोडणीकरिता लागणाऱ्या दोन लघुदाब पोल उभारणीचे काम अपूर्ण होते. सदर काम झालेले नसल्यामुळे अर्जदाराची तक्रार प्राप्त झाल्यानंतर दोन लघुदाब वाहिनीचे विद्युत पोल उभारणीचे काम पूर्ण करुन त्यांचा वीजपुरवठा माहे ऑक्टोबर, २०१६ च्या सुमारास कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच सदरील शेतकऱ्याला देण्यात आलेल्या चुकीच्या वीज देयकाची दुरुस्ती डिसेंबर, २०१६ च्या वीज देयकामध्ये दिलेली आहे.

(३) यासंदर्भात वीज जोडणी न करता वीज देयके अदा केल्याबाबत सहायक अभियंता, पाइट शाखा, महावितरण यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

मुंबई उपनगरातील गोराई गाव येथे नविन वीज मिटर जोडणेबाबत

(४१) ७१६३२ (२७-०१-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोराई गाव सर्व्हे नं.१८२४ तसेच २१२, ७९८, ६११, १३७५, १४५१ येथे नविन वीज मिटर जोडणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी तक्रार केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०३-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनावर नियमानुसार योग्य कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश रिलायन्स कंपनीला दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ रोजी देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयातील जिल्हा अधिक्षकांसह ५ जणांवर गुन्हे दाखल करण्याबाबत

(४२) ७१६९२ (१६-१२-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोल्हापूर येथील कार्यालयातील कारवाई मध्ये जप्त केलेला माल परत करण्यासाठी, दारु दुकानाचा परवाना पुनरुज्जीवित करण्यासाठी व खोटी माहिती शासनाला सादर करणे या कारणास्तव जिल्हा अधिक्षकांसह ५ जणांवर निलंबनाची कारवाई माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीअंती उक्त दोषींवर गुन्हे दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०३-२०१७) :(१) व (२) होय. तथापि, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोल्हापूर येथील कार्यालयातील कारवाईमध्ये जप्त केलेला माल परत करण्यासाठी लाचेची मागणी केल्याप्रकरणी एक जवान, एक सहाय्यक दुय्यम निरीक्षक अशा २ कर्मचाऱ्यांना जुलै, २०१६ मध्ये निलंबित करण्यात आले आहे.

दारु दुकानाचा परवाना पुनरुज्जीवित करण्यासाठी लाचेची मागणी केल्याप्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत तत्कालीन अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना निलंबित करण्यात आले आहे. विभागीय चौकशीबाबतची कार्यवाही प्रक्रियेत आहे.

(३) सदर प्रकरणातील निलंबित एक जवान व सहाय्यक दुय्यम निरीक्षक यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे. तसेच मा.सत्र न्यायाधीश रत्नागिरी यांचे आदेश दि.५.१०.२०१६ अन्वये तत्कालीन अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना ५ वर्षांची कारावासाची शिक्षा व रु.१०,०००/- दंड आदेशित केलेला आहे. त्यानुसार सदर प्रकरणातील दोषी तत्कालीन अधीक्षक, राऊशु यांना शासन सेवेतून बडतर्फ करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासकीय आश्रमशाळेमधील आदिवासी बालकांच्या होणाऱ्या मृत्यूची दखल राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने (एनएसआरसी) घेतल्याबाबत

(४३) ७२२४४ (२७-०१-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आश्रमशाळा मधील आदिवासी बालकाचे होणाऱ्या मृत्यूची दखल राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने (एनएसआरसी) घेऊन राज्य सरकारला याबाबत नोटीस बजावली

असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चार आठवडयात वस्तुस्थिती निदर्शक अहवाल देण्याची सूचना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०५-०५-२०१७) :(१), (२) व (३) मा.राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली यांनी दि.१३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये नोटीस बजावून ४ आठवड्याच्या आत अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

त्याअनुषंगाने शासनाच्या दि.२८.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मा.राष्ट्रीय मानव अधिकार आयोग यांना विहित मुदतीत खुलासा सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी बालकांमधील कुपोषण कमी करण्याबाबत

(४४) ७२४१३ (११-०१-२०१७). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी बालकांमधील कुपोषण कमी करण्यासाठी ठाणे येथील हिंदुस्थान लॅबोरेटीज कंपनीने पत्र दिले म्हणून तत्कालिन आदिवासी विकास मंत्र्यांनी लिक्विड प्रोटीनच्या खरेदीचे आदेश दिल्याचे न्यायमूर्ति गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली सुरु असलेल्या चौकशी समितीत निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, या अहवालात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने राज्यातील आदिवासी बालकांमधील कुपोषण कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विष्णु सवरा (३०-०४-२०१७) :(१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, चौकशी समितीने त्यांचा अहवाल शासनाकडे दि.३०/०१/२०१७ रोजी सादर केला आहे.
(३) समितीने त्यांचा अहवाल दि.३१/०१/२०१७ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे सादर केला असून न्यायालयाच्या आदेशाशिवाय शासनास प्राप्त झालेला अहवाल उघड करता येत नाही.
(४) आदिवासी क्षेत्रातील ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पर्याप्त पोषण घटक देण्यासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनांतर्गत विविध योजना घेण्यात येत आहेत. तसेच तीव्र कुपोषित बालकांसाठी ग्रामबाल विकास केंद्र (VCDC) सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्याशिवाय डॉ.ए.पी.जे.अब्दुल कमाल अमृत आहार योजनेंतर्गत अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना अंडी/केळी/स्थानिक फळे इत्यादीसह अतिरिक्त आहार पुरविण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलडाणा शहरात जादा दराने दारु विक्री करणा-या दुकानांचे परवाना रद्द करण्याबाबत

(४५) ७२५६९ (१६-१२-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा शहरातील दोन दुकानांवर जादा दराने दारु विक्री केल्याची दंडात्मक कारवाई करुनही या दुकानात जादा दराने दारुविक्री सुरु असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील अनेक वाईन शॉप व परमिट रुममध्ये जादा दराने दारु विक्री सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ नुसार शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती सदर दुकानांचे परवाना रद्द करण्याबाबत तसेच शासनाने विशेष मोहिम राबवून जादा दराने दारुविक्री करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०४-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

या जिल्ह्यातील सर्व कार्यकारी अधिकारी, निरीक्षक, दुय्यम निरीक्षक यांनी माहे एप्रिल, २०१६ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत एकूण १६६३ अनुज्ञप्ती निरीक्षण नोंदविले असून त्यापैकी ४० विभागीय गुन्ह्यांची नोंद आहे. तर १९ जादा दराने मद्य विक्री केल्याबाबत गुन्ह्यांची नोंद करुन दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात आदिवासींना आदिवासी योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत

(४६) ७२६२९ (११-०१-२०१७). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासींच्या ४५ जमाती समूह आणि १८३ जमाती असून त्यांची संख्या १ कोटी ५ लाखांवर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकासासाठी आर्थिक तरतूद १९८३ मधील सुमारे अडीचशे कोटीवरून आता सुमारे तब्बल ५ हजार कोटीच्या घरात गेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इतकी रक्कम असूनही विविध विकास योजनेच्या लाभांपासून बहुसंख्य आदिवासी वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, १९७२ मध्ये आदिवासी सहकारी विकास महामंडळ स्थापन झाले असून त्यांनी ९३८ आदिवासी सोसायट्या स्थापन केल्या पण आज त्या मृतपाय स्थितीत आहेत हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, देशात आदिवासी संख्येत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर असताना योजनांपासून लाखो आदिवासी वंचित राहण्यामागची कारणे काय आहेत, त्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१८-०५-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक ही संस्था सहकारी कायद्यांतर्गत सन १९७२ साली स्थापन झाली असून त्याच्या अंतर्गत असलेल्या ९३८ सोसायट्या या सहकार कायद्याअंतर्गत नोंदणी झालेल्या आहेत. या संस्था आर्थिकदृष्टया सक्षम करण्याकरीता एक सदस्य समिती नियुक्ती करण्यात आली असून त्यानी सुचविलेल्या उपाययोजना संदर्भातील अहवाल सहकार विभागास सादर करण्यात आलेला आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळण्याकरिता प्रकल्प अधिकारी स्तरावर तसेच अपर आयुक्त, स्तरावरुन वेगवेगळया उपाययोजना करण्यात येत असून शासन यंत्रणा कार्यक्षमपणे राबविण्यात येत आहे. अशा प्रकारे आदिवासी या योजनांपासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी घेण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मानखुर्द, मुंबई येथील महाराष्ट्र नगर येथील रहिवाश्यांना वीज कनेक्शनसाठी, सबस्टेशन बांधण्यासाठी परवानगी मिळणेबाबत

(४७) ७२६८८ (०७-०१-२०१७). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानखुर्द, मुंबई येथील महाराष्ट्र नगर येथील रहिवाश्यांना वीज कनेक्शनसाठी, सबस्टेशन बांधण्याची परवानगी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रा, मुंबई यांना माहे नोव्हेंबर, २०१५ पासून वारंवार निवेदने देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०३-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्हयातील आदिवासी वनधारकांचे प्रलंबित संपूर्ण वनहक्क दावे मंजूर करुन ७/१२ उतारे वाटप करण्याबाबत

(४८) ७२९२७ (११-०१-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील आदिवासी वनधारकांचे प्रलंबित संपूर्ण वनहक्क दावे मंजूर करुन ७/१२ उतारे वाटप करावेत यासह विविध मागण्यांसाठी एकलव्य संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले असून याबाबत जिल्हा प्रशासनाला निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आंदोलनाची दखल घेऊन शासनाने वैयक्तिक व सामुहिक वनहक्क दावे दाखल करण्यास मुदतवाढ द्यावी तसेच इतर मागण्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२४-०५-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) निवेदनात उपस्थित केलेल्या मुद्यांवर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत उपविभागीय अधिकारी धुळे व शिरुर यांना तसेच संबंधित ग्रामसेवक यांना जिल्हाधिकारी, धुळे कार्यालयामार्फत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उदभवत नाही.

नागपूर जिल्हयातील खापरखेडा औष्णिक विज केंद्रात ५० कंत्राटी कामगारांची नियमबाहय नियुक्ती केल्याबाबत

(४९) ७९८०७ (२०-०४-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील खापरखेडा औष्णिक विज केंद्रातील अधिकाऱ्यांनी नविन ५० कंत्राटी कामगारांची नियमबाहय नियुक्ती कंत्राटदाराच्या मार्फत केली असल्याची माहिती दि. ३ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ५० नविन कंत्राटी कामगारांची यादी व उपमुख्य अभियंता (प्रशासन) व कंत्राटदारांनी दिलेलया नियुक्ती पत्रासह तपशिलाची माहिती लोकप्रतिनिधीनी दिनांक २३/११/२०१६ रोजीच्या लेखी पत्राव्दारे मागीतली असता मुख्य अभियंता यांनी दिनांक २/२/२०१७ रोजी दिलेल्या पत्रात मोघम स्वरुपाची माहिती देवून लोकप्रतिनिधीची दिशाभूल केली आहे हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या सर्व प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, चौकशीअंती नियमबाह्य नियुक्त्या करणाऱ्या संबधितावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०६-२०१७) : (१) खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात विविध विभागात अकुशल कामगारांची कमतरता भासत असल्याने महानिर्मिती कंपनीच्या मुख्य सांघिक कार्यालय, मुंबई यांच्या परवानगीने ५० अकुशल कामगार कंत्राटदारामार्फत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त करण्यात आले आहेत.
(२) मुख्य अभियंता, खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र यांनी औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा येथे ५० स्थानिक बेरोजगारांना कंत्राटदारांमार्फत अकुशल प्रशिक्षणार्थी म्हणून घेण्यात आल्याची माहिती संबंधित लोकप्रतिनिधींना त्यांच्या दि. ०२.०२.२०१७ च्या पत्रान्वये दिली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी विकास विभागांतर्गत स्वतंत्र बांधकाम खाते सुरु करण्याबाबत

(५०) ८१४९८ (२८-०४-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाच्या कामात गतिमानता यावी व दिरंगाई होऊ नये म्हणून आदिवासी विकास विभागांतर्गत स्वतंत्र बांधकाम खाते सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे बांधकाम खाते कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२३-०५-२०१७) :(१) व (२) शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहे यांचे बांधकाम आणि देखभाल-दुरुस्तीसाठी आदिवासी विकास विभागाच्या दि.१४ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागांतर्गत स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला असून सदर कक्ष कार्यान्वित झाला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.